ठाणे, बुधवार दि. २४ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ८७ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

अग्रलेख


**प्लास्टिक प्रदुषणाचा विळखा**

आयआयटी खरगपूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, भारतातील ४९६ प्रमुख शहरांपैकी मुंबई हे प्लास्टिक प्रदूषणाचा सर्वात अधिक गंभीर धोका असलेले शहर ठरले आहेत. मुंबईतील डम्पिंग ग्राऊंड्स प्रदूषणाचे कारण ठरत आहेत. ......पान २ वर

दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे संपादक : चंद्रकांत भोईटे



गाडीच्या प्रवासात मळमळ, उलटी होत असेल तर लिंबू जवळ ठेवा! ...पान ४ वर

# मोदी 3.0 सरकारचा पहिला अर्थसंकल्प सादर

## तरुणांना रोजगार, महिला, शेतकऱ्यांसाठी मोठ्या घोषणा!



**नवी दिल्ली – अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज (मंगळवारी) लोकसभेत २०२४–२५ या आर्थिक वर्षाचा संपूर्ण अर्थसंकल्प सादर केला. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचा हा सातवा आणि मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिला अर्थसंकल्प आहे. यापूर्वी, हे निवडणुकीचे वर्ष असल्याने, १ फेब्रुवारी रोजी सादर करण्यात आलेल्या अंतरिम अर्थसंकल्पात कोणतेही महत्त्वपूर्ण धोरणात्मक बदल दिसून आलेले नाहीत. मात्र, या अर्थसंकल्पामध्ये (णपळेप ींवसशीं २०२४) महिला, शेतकरी, विद्यार्थी, तरूण, रोजगार यांच्यासाठी महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत.**

### २०२४ च्या अर्थसंकल्पात रोजगार निर्मितीवर विशेष भर

मोदी सरकारच्या या अर्थसंकल्पात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अनेक मोठ्या घोषणा केल्या आहेत. तरुणांचा कौशल्य विकास, शिक्षण, कृषी आणि रोजगार निर्मिती यासारख्या क्षेत्रांवर त्यांनी अर्थसंकल्पात विशेष लक्ष देण्यात आलेले आहे. देशाच्या पूर्वेकडील राज्यांना आर्थिक विकासाचे इंजिन बनवण्यासाठी विशेष योजनांची घोषणाही अर्थमंत्र्यांनी केली आहे. अर्थमंत्र्यांनी ११ वाजता अर्थसंकल्पीय भाषणाला सुरुवात केली.

### बिहार आणि आंध्र प्रदेशसाठी अर्थसंकल्पात मोठी घोषणा

आजचा अर्थसंकल्प मांडत असताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन (छळीरश्र डळींहरीरारप) यांनी चंद्राबाबू नायडू मुख्यमंत्री असलेल्या आंध्र प्रदेशसाठी १५ हजार कोटींच्या निधीची तरतूद केली आहे. तर नितीश कुमार मुख्यमंत्री असलेल्या बिहारसाठी २६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यासाठी अर्थमंत्र्यांनी दोन्ही राज्यांसाठी विशेष पॅकेज जाहीर करण्यात आले आहे.

- शेती, शेतीपुरक क्षेत्रासाठी १.५२ लाख कोटी रुपयांची तरतूद
- २० लाख तरुणांना रोजगार देण्यासाठी केंद्र सरकारकडून प्रयत्न
- उच्च शिक्षणासाठी १० लाख रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी मदत
- कर्मचाऱ्यांमध्ये महिलांचा सहभाग वाढवण्यास प्राधान्य
- वसतिगृह बांधण्यासाठी आणि महिलांसाठी विशेष कौशल्य कार्यक्रम



### काय स्वत होणार?

- सोनं, चांदी स्वस्त होणार
- सोनं-चांदीवर ६.५ टक्के ऐवजी ६ टक्के आयात कर
- मोबाईल हँडसेट
- मोबाईल चार्जरच्या किंमती १५ टक्क्यांनी कमी होणार
- मोबाईलचे सुटे भाग
- कॅन्सरवरची औषधे
- पोलाद, तांबे उत्पादनावरील प्रक्रियेवर करसवलत
- लिथियम बॅटरी स्वस्त
- इलेक्ट्रीक वाहने स्वस्त होणार
- सोलार सेट स्वस्त होणार
- चामड्यांपासून बनणाऱ्या वस्तू
- पीवीसी फ्लेक्स बॅनर
- विजेची तार

### काय महाग होणार?

- प्लास्टीक उद्योगांवर करांचा बोझा वाढणार
- प्लास्टीक उत्पादने महाग होणार

## इन्कम टॅक्स स्लॅबमध्ये मोठे बदल...

### नोकरदारांचे १७५०० रुपये वाचणार

निर्मला सीतारामन यांनी सामान्य नोकरदारांच्यादृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या नव्या Income Tax Slab विषयी घोषणा केली. जुन्या करणप्रणालीनुसार कर भरणाऱ्या नोकरदारांसाठी कोणताही बदल करण्यात आलेला नाही. मात्र, नव्या करप्रणालीनुसार कर भरणाऱ्या नोकरदारांसाठी निर्मला सीतारामन यांनी महत्त्वाची घोषणा केली. नव्या करणप्रणालीचा अवलंब करणाऱ्या नोकरदरांचे १७५०० रुपये वाचणार आहेत. याशिवाय, नव्या करप्रणालीत स्टँटर्ड डिडक्शनची मर्यादा ५० हजारावरुन ७५ हजारापर्यंत वाढवण्यात येणार आहे. तर फॅमिली पेन्शन डिडक्शनची मर्यादा १५ हजारावरुन २५ हजार रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. एकीकडे, सरकारने नवीन कर प्रणालीमध्ये स्टँटर्ड डिडक्शनची मर्यादा बदलली तर कर स्लॅब देखील पूर्वीपेक्षा सोपे केले आहेत. दुसरीकडे, जुन्या कर प्रणालीमध्ये सरकारला सूट वाढवणे अपेक्षित होते, परंतु सरकारने त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बदल केलेले नाहीत. आता करप्रणालीतील हे बदल करदात्यांच्या पचनी पडणार का, हे पाहावे लागेल. नव्या करप्रणालीत झालेले बदल नोकरदारांसाठी फायदेशीर ठरणार, असे तुर्तास तरी दिसत आहे.



### नवी कररचनेत बदल

- नोकदरांसाठी स्टँडर्ड डिडक्शन ५० हजारांवरुन ७५ हजारांवर
- ३ लाखांपर्यंतचं उत्पन्न टॅक्स फ्री
- ३ ते ७ लाख उत्पन्न – ५ टक्के आयकर
- ७ ते १० लाख उत्पन्न– १० टक्के आयकर
- १० ते १२ लाख उत्पन्न – १५ टक्के आयकर
- १२ ते १५ लाख उत्पन्न – २० टक्के आयकर
- १५ लाखांवर उत्पन्न – ३० टक्के आयकर

### जुन्या करप्रणालीनुसार किती कर भरावा लागणार?

देशात सध्या जुनी आणि नवी अशा दोन करप्रणाली आहेत. जुन्या करप्रणालीचा विचार करायचा झाल्यास २.५० लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कोणताही कर लागत नाही. २.५ लाख ते ५ लाख रुपयांच्या उत्पन्नावर ५ टक्के कर लागू आहे. ५ ते १० लाख रुपयांच्या वार्षिक उत्पन्नावर २० टक्के कर आकारला जाो. तर १० लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्यांना सरसकट ३० टक्के कर भरावा लागतो. जुन्या करप्रणातील २.५० लाख ते ५ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर जो कर आकारला जातो ती रक्कम कर परतव्याच्या तरतुदीनुसार परत मिळते. त्यामुळे जुन्या करप्रणालीनुसार बघायला गेल्यास ५ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त आहे. नव्या करप्रणालीनुसार ३ लाखांपेक्षा जास्त उत्पन्न असल्यास ५ टक्के कर लागू होतो. नव्या करप्रणातील स्टँटर्ड डिडक्शन वगळता इतर कोणत्याही पद्धतीने आयकरात सूट मिळत नाही.

## मोदी ३.0 च्या पहिल्या अर्थसंकल्पाचे ठळक मुद्दे

1. २ लाख कोटी रुपयांच्या तरतुदीसह तरुणांसाठी ५ योजनांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये ५ कोटींहून अधिक तरुणांना फायदा होणार आहे. रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी ३ योजनांची घोषणा करण्यात आली आहे.
2. कृषी आणि संलग्न क्षेत्रांसाठी १.५२ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचा फायदा शेतकरी आणि त्यांच्या जमिनींना होईल. ६ कोटी शेतकरी शेतकरी आणि जमीन नोंदणीच्या कक्षेत येतील.
3. पूर्वेकडील राज्ये विकसित भारताचे इंजिन बनतील. बिहारला ३ एक्सप्रेसवे मिळाले. २६ हजार कोटी रुपये खर्चून नवीन रस्ते बांधण्यात येणार आहेत. गयामध्ये इंडस्ट्रियल हब बनवण्यात येणार आहे.
4. उत्पादन क्षेत्रात रोजगार निर्मिती. प्रथमच कर्मचाऱ्यांना एझक्रज मध्ये त्यांच्या योगदानानुसार प्रोत्साहन मिळेल. ३० लाख तरुणांना फायदा होणार आहे.
5. प्रत्येक नवीन कर्मचाऱ्यासाठी, कंपन्यांना २ वर्षांसाठी दरमहा ३-३ हजार रुपये प्रतिपूर्ती मिळेल. याचा फायदा ५० लाख लोकांना होणार आहे.
6. फॉर्मल सेक्टरमध्ये क्षेत्रात काम करणाऱ्यांना थेट लाभ हस्तांतरण अंतर्गत १५,००० रुपयांपर्यंतचा लाभ दिला जाईल. एक लाख रुपयांपर्यंत पगार असलेले कर्मचारी यासाठी पात्र असतील. २ लाखाहून अधिक तरुणांना याचा फायदा होणार
7. शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी संशोधन केले जाईल. बदलत्या हवामानानुसार पिकांचा विकास होईल.
8. मुद्रा कर्ज मर्यादा वाढली आहे. आता या योजनेंतर्गत १० ऐवजी २० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज मिळणार आहे.
9. ग्रामीण विकासासाठी २.६६ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.
10. अर्थमंत्र्यांनी १२ औद्योगिक उद्यानांची घोषणा केली आहे.

### पीएम मुद्रा कर्ज मर्यादा दुप्पट; आता २० लाखांपर्यंत कर्ज मिळणार

पंतप्रधान मुद्रा योजनेसंदर्भात मोठी घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. या सरकारी योजनेअंतर्गत मुद्रा कर्जाची मर्यादा दुप्पट करण्यात आली आहे. यापूर्वी या योजनेअंतर्गत एमएसएमईंना १० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज दिलं जात होतं, ते आता २० लाख रुपये करण्यात आलं आहे.

## मोबाईल फोन, चार्जर, चांदी, सोनं, सोलर सेट, इलेक्ट्रिक वाहनं, कॅन्सरची औषधं स्वस्त

### आता सोनं-चांदी होणार स्वस्त

**सीमा शुल्कात घट करण्याचा केंद्राचा मोठा निर्णय**

सरकारने सोने-चांदीच्या सीमा शुल्कात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. याआधी सोने-चांदीचे सीम शल्क १५ टक्के होते. आता यात कपात करून सीमा शुल्क थेट ६ टक्क्यांवर आणण्यात आला आहे. म्हणजेच सरकारने सीमा शुल्क थेट अर्ध्यापर्यंत कमी केले आहे. त्यामुळे आता या मौल्यवान धातूंची किंमतही कमी होण्याची शक्यता आहे.

**नेमका काय बदल झाला?**



- सोने, चांदीवरील सीमा शुल्क – ६ टक्के
- प्लॅटिनमवरील सीमा शुल्क– ६.४ टक्के
- अमोनिअम नायट्रेटवरील सीमा शुल्क ७ टक्क्यांवरून १० टक्के करण्यात आले आहे.

- **मुंबईत सोने ५ हजाराने स्वस्त...** (पान २ वर)
- **पुणे, जळगाव शहरात ३ हजाराने स्वस्त**

## मोदी सरकार मेहरबान विशेष पॅकेज जाहीर

### बिहारमध्ये बनवणार रस्त्यांचे जाळे, बजेटमध्ये २६ हजार कोटींची तरतूद

केंद्र सरकारने २०२४ च्या अर्थसंकल्पात बिहारला मोठी भेट दिली आहे. अर्थमंत्री सीतारामन यांनी बिहारला आर्थिक मदत जाहीर केली आहे. बिहारच्या बोधगयामध्ये आम्ही औद्योगिक विकासाला चालना देऊ, असे अर्थमंत्र्यांनी यावेळी सांगितलं आहे. त्यामुळे पूर्व विभागाच्या विकासाला चालना मिळणार आहे. रस्ते जोडणी प्रकल्पांच्या विकासातही आम्ही सहकार्य करू. पाटणा-पूर्णिया द्रुतगती मार्ग, बक्सर-भागलपूर महामार्ग, बोधगया-राजगीर-वैशाली-दरभंगा आणि बक्सरमध्ये गंगा नदीवर अतिरिक्त द्विपदरी पूल २६,००० कोटी रुपये खर्चून बांधण्यात येणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बिहारमध्ये नवीन विमानतळ, वैद्यकीय सुविधा आणि क्रीडा पायाभूत सुविधांची घोषणा केली. याशिवाय राज्यातील महामार्गांसाठी आणखी २६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### आंध्र प्रदेशच्या नवीन राजधानीसाठी १५000 कोटी देणार

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आंध्र प्रदेशच्या नवीन राजधानीसाठी १५,००० कोटी रुपयांची घोषणा केली आहे. टीडीपीकडून अमरावतीला आंध्र प्रदेशची राजधानी बनवायची आणि विकसित करायची आहे, त्यासाठी त्यांना १५ हजार कोटी रुपये देण्यात यावेत, अशी मागणी सातत्याने होत होती. चंद्राबाबू नायडू यांच्या नेतृत्वाखालील टीडीपी सरकारला केंद्र सरकारने सहमती दर्शवली असून आता अर्थसंकल्पात नवीन भांडवलाच्या बांधकामासाठी निधीची घोषणा केली आहे. अमरावती विजयवाड्याजवळ वसलेले आहे. अमरावतीला सुरवातीपासून तयार केले जात आहे.

## कृषीसाठी १.५२ लाख कोटी रुपयांची तरतूद



निर्मला सीतारामन म्हणाल्या की, कृषी व संलग्न क्षेत्रांसाठी १.५२ लाख कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याचा कृषी क्षेत्राच्या विकासासाठी मोठा फायदा होईल. शेती क्षेत्रातील उत्पादकता वाढावी यासाठी डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर पुरवले जाणार आहे. यातून शेतीपिकांचे सर्वेक्षण, मातीची तपासणी अशा सर्व गोष्टींची माहिती शेतकऱ्यांना दिली जाणार आहे. तसेच नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक ती पावलं उचलली जाणार आहे. आगामी वर्षात आम्ही नैसर्गिक शेतीवर भर देण्याचा निर्णय घेतला असून पुढील काही वर्षात एक कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती करण्यास प्रोत्साहन दिले जाणार असल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली आहे.

### कृषी क्षेत्रासाठी महत्वाच्या घोषणा

- नैसर्गिक शेतीला प्राधान्य देणार
- कृषी उत्पादन वाढवण्यावर सरकारचा भर
- डाळ आणि तेलबियांच्या उत्पादनात स्वयंपूर्ण होण्यावर भर
- शेतकऱ्यांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म उभारणार, सहा कोटी शेतकऱ्यांचा रेकॉर्ड डिजिटल होणार
- शेती क्षेत्रातील उत्पादकता वाढवण्यासाठी डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर पुरवलं जाईल. त्यातून शेतीपिकांचं सर्वेक्षण, मातीची तपासणी अशा सर्व गोष्टींची माहिती शेतकऱ्यांना दिली जाईल.
- या वर्षी शेती व संलग्न क्षेत्रांसाठी १.५२ लाख कोटींची तरतूद करण्यात आली आहे
- सोयाबीन आणि सुर्यफुल बियांची साठवण वाढवणार
- ३२ फळ आणि भाज्यांच्या १०९ जाती वितरीत करणार

## देशातील नोकऱ्या वाढवण्यासाठी मोदी सरकारच्या तीन गेमचेंजर योजना

### पहिल्यांदा नोकरीला लागणाऱ्या तरुणांना १५ हजारांचा Incentive

या अर्थसंकल्पात (ईींवसशीं २०२४) देशातील रोजगार वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण योजनांची घोषणा करण्यात आली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी रोजगार आणि कौशल्य विकासासाठी तीन नव्या योजनांबाबत संसदेत माहिती दिली. या योजनांच्या माध्यमातून पहिल्यांदा नोकरीला लागणाऱ्या तरुणांना केंद्र सरकारकडून प्रोत्साहनपर भत्ता दिला जाणार आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधीसाठी होणाऱ्या नोंदणीच्याआधारे हा प्रोत्साहनपर भत्ता दिला जाईल.

**५ वर्षात टॉप ५०० कंपन्यांमध्ये १ कोटी तरुणांना इंटर्नशिप**

**स्कीम ए योजना–** या तीन योजनांपैकी पहिल्या म्हणजे **स्कीम ए** मध्ये संघटित क्षेत्रात पहिल्यांदा कामाला लागणाऱ्या तरुणांना प्रोत्साहनपर भत्ता दिला जाईल. या नोकरदारांच्या बँक खात्यात तीन टप्प्यांत थेट पैसे जमा केले जातील. या योजनेनुसार नव नोकरदारांना १५ हजारापर्यंतचा प्रोत्साहनपर भत्ता अर्थात Incentive दिला जाईल. महिन्याला १ लाख रुपयापर्यंत वेतन असणारे नोकरदार या योजनेसाठी पात्र असतील. हे पैसे EPFO खात्यात जमा होतील. या योजनेमुळे २ कोटी १० लाख तरुणांना फायदा होईल, असे निर्मला सीतारामन यांनी सांगितले.



**स्कीम बी योजना–** रोजगार आणि (पान २ वर)

### बजेटमध्ये तरुणांसाठी काय?

- **खाजगी क्षेत्राच्या सहकार्याने ई-कॉमर्स निर्यात केंद्र तयार केले जाईल आणि तरुणांच्या इंटर्नशिपसाठी सर्वसमावेशक योजना आणली जाईल.**
- **५ वर्षात टॉप ५०० कंपन्यांमध्ये १ कोटी तरुणांना इंटर्नशिप, १०० शहरांमध्ये औद्योगिक पार्क विकसित केले जातील.**
- **MSME हमी योजनेअंतर्गत १०० कोटी रुपयांपर्यंतची कर्जे उपलब्ध होतील, PSU बँकांनी अंतर्गत मूल्यांकनानंतर MSME ला कर्ज द्यावे. MUDR- कर्ज मर्यादा १० लाख रुपयांवरून २० लाख रुपयांपर्यंत वाढवली आहे. MSME ला मदत करण्यासाठी SIDBI शाखा वाढवल्या जाणार आहेत.**

## नीट-यूजी फेरपरीक्षा होणार नाही

**सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय**

**मुंबई – नीट-यूजी पेपरफुटी प्रकरणानंतर ही परीक्षा पुन्हा घेण्यात यावी, अशी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सुनावणी घेत असताना फेरपरीक्षा घेण्याची मागणी फेटाळून लावत पेपरफुटी प्रकरण हे पूर्वनियोजित असल्याचा एकही पुरावा मिळाला नसल्याचेही न्यायालयाने सांगितल. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील तीन न्यायाधीशाच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.**



सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी निकाल देताना सांगितले, नॅशसनल टेस्टिंग एजन्सी आणि आयआयटी मद्रासने दिलेला अहवाल तपासल्यानंतर लक्षात येते की, पेपरफुटी प्रकरणाची व्याप्ती फार मोठी नाही किंवा हे प्रकरण फार व्यापक नाही. सध्या आपल्याकडे असलेल्या पुराव्याच्या आधारे पेपरफुटी प्रकरण हे सुनियोजित पद्धतीने राबवविले गेले, हे सिद्ध होत नाही. त्यामुळे परीक्षेचे पावित्र्य भंग झाले, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही, असेही सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड म्हणाले.

तसेच हजारीबाग आणि पाटणा येथे पेपरफुटी झाली याबाबतही आम्हाला बिलकुल संशय नाही. त्याठिकाणी पेपरफुटी झाली आहे, असेही खंडपीठाने सांगितले. सीबीआयच्या अहवालानुसार या दोन परीक्षा केंद्रावरील १५५ विद्यार्थ्यांच्या पलीकडे आणखी काही लाभार्थी असण्याची शक्यता कमीच आहे, असेही न्यायालयाने सांगितले.

देशभरात ५ मे रोजी 'नीट-यूजी'ची प्रवेश परीक्षा झाली होती, त्यामध्ये प्रश्नपत्रिका फुटणे, परीक्षार्थींना गुण वाढवून देणे आणि तोतयागिरी यासह गैरप्रकार झाल्याचे आरोप करणाऱ्या ४०पेक्षा जास्त याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत. त्या सर्व याचिकांवर आज एकत्रित सुनावणी होईल.

या सुनावणीपूर्वी, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करत 'नीट-यूजी'चे 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी'ने शहरनिहाय आणि केंद्रनिहाय निकाल शनिवारी आपल्या संकेतस्थळांवर जाहीर केले. त्यातील तपशिलांनुसार, भरघोस गुण मिळाल्यानंतर फेरपरीक्षा द्यावी लागलेल्या विद्यार्थ्यांची (पान २ वर)

## बेवारस रुग्णांना अज्ञात स्थळी फेकणारे ससूनचे निर्दयी डॉक्टर अखेर निलंबित; दोघांवर गुन्हा दाखल

**पुणे: ससून रुग्णालयातून माणुसकीला काळिमा फासणारी घटना समोर आली आहे. ससूनचे डॉक्टर बेवारस रुग्णांना अज्ञात स्थळी फेकून देत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वंचित बहुजन आघाडीचे रितेश गायकवाड आणि दादासाहेब गायकवाड कार्यकर्त्यांनी स्टिंग ऑपरेशन करत हा प्रकार समोर आणला आहे. ससूनचे डॉ आदी आणि त्यांचे सहकारी या प्रकरणात असल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणी संबंधित डॉक्टरवर तातडीने निलंबनाची कारवाई करण्यात आली असून त्यांच्यावर येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. डॉ. आदी कुमार (ज्युनियर रेसिडेंट, ऑर्थो विभाग) असे या निर्दयी डॉक्टराचे नाव आहे.**

डॉक्टर आहेत कि कसाई, बेवारस रुग्णांना अज्ञात स्थळी फेकून देणाऱ्या या डॉक्टरांवर कारवाई होणार का? असा सवाल उपस्थित होऊ लागला होता. त्याचा व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाला. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून ससूनचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार यांनी डॉ. आदी आणि त्यांच्या सहकाऱ्याला निलंबित केले आहे. तसेच त्यांच्यावर येरवडा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. (पान २ वर)

### हा प्रकार डॉक्टरांमधील असंवेदनशीलता दाखवणारा - आमदार धंगेकर

डॉक्टर बेवारस रुग्णांना निर्जनस्थळी सोडून देतात. काही दिवसांनी हेच डॉक्टर रुग्णांच्या शरीराचे अवयव विक्री करण्यास देखील मागेपुढे पाहणार नाहीत. त्यामुळे अशा डॉक्टरांचे तातडीने निलंबन झाले पाहिजे. त्यांना मदत करणाऱ्या कर्मचाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे. त्यामुळे असे प्रकार पुन्हा होणार नाहीत. खासगी रुग्णालयातील दर परवडत नाहीत म्हणून अनेक रुग्ण सरकारी रुग्णालयात उपचारासाठी येतात. पण सरकारी रुग्णालयात होणारी पिळवणूक, मिळणारी अपमानास्पद वागणूक वाढत चालली आहे. त्यातूनच हा निर्जनस्थळी सोडून देण्याचा प्रकार घडला आहे, जो डॉक्टरांमधील असंवेदनशीलता दाखवणारा असल्याचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी सांगितले आहे.

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## प्लास्टिक प्रदुषणाचा विळखा

आयआयटी खरगपूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, भारतातील ४९६ प्रमुख शहरांपैकी मुंबई हे प्लास्टिक प्रदूषणाचा सर्वात अधिक गंभीर धोका असलेले शहर ठरले आहेत. मुंबईतील डम्पिंग ग्राऊंड्स प्रदूषणाचे कारण ठरत आहेत. डंपिंग ग्राऊंड्सवर प्लास्टिक कचरा मोठ्या प्रमाणात असतो. त्याचा परिणाम परिसरातील पर्यावरणार होत आहे. मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी समजली जाते. सगळीकडे स्वच्छ मुंबई, सुंदर मुंबई असा जयघोष सुरू असताना मुंबईच्या प्रदूषणाबाबत येणारे अहवाल सकारात्मक नाहीत. २०२२ मध्ये एल्सेव्हियर जर्नल रिसोर्सेस, कन्झर्व्हेशन एड रीसायकलिंग या जर्नलमध्ये रिस्क ऑफ प्लास्टिक लॉसेस टू दि एन्व्हायर्नमेंट फ्रॉम इंडियन लॅण्डफिल्स हा अहवाल सादर झाला होता. या अहवालात भारतातील प्रमुख शहरांचे प्लास्टिक प्रदूषणाच्या दृष्टिकोनातून सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये मुंबई येथे असणाऱ्या डम्पिंग ग्राऊंडचा स्थळ आणि कार्यपद्धतीच्या दृष्टीने अभ्यास केला तर मुंबई हे सर्वात धोकादायक शहर आहे, असे निष्पन्न होते, असे हा अहवालात नमूद केले आहे. तसेच आयआयटी खरगपूर येथील संशोधकांनी सादर केलेल्या अहवालातही भारतातील प्रमुख ४९६ शहरांमध्ये मुंबई हे प्लास्टिक प्रदूषणाचा सर्वात अधिक धोका असलेले शहर आहे, असे नमूद केले आहे. वारा, पाऊस, पूर यामुळेही कचऱ्याची गळती होऊन, कचरा वाहून जाऊन प्रदूषणाचा धोका वाढत आहे, असे हा अहवाल सांगतो. मुंबईमध्ये जुलै २००५ मध्ये आलेल्या महापुरामुळे जनजीवन उद्धवस्त झाले होते. हा महापूर का आला, याचा शोध घेता प्लास्टिक प्रदूषण हे महत्वाचे कारण आढळले होते. आजही मुंबईला प्लास्टिक प्रदूषणाचा विळखा आहे, हे अनाकलनीय पण सत्य आहे. याचा अर्थ राज्य सरकार प्लास्टिक प्रदूषणावर कोणताही उपाय करीत नाही असे दिसते. केंद्र व राज्य सरकारने प्लास्टिक बंदीची कुर्हाड उगारली की काही दिवस प्लास्टिकचा मागमुसही दिसत नाही. काही ठिकाणी कारवायांचा फार्स केला की झाले ! असे प्लास्टिक बंदीबाबत आपल्या सरकारचे धोरण दिसते. त्यामुळेच प्लास्टिक बंदी असुनही राज्य सरकारच्या गलथानपणामुळे सर्वत्र प्लास्टिकचा उच्छेद दिसुन येत आहे. प्लास्टिक प्रदुषणामुळे सागरी जीवांना धोका तर आहेच परंतु पावसाळयात महापूर येऊन मुंबई, ठाणे इ. शहरांत जिवित हानी होण्याची भीती आहे. मुंबईतील देवनार, कांजूरमार्ग आणि मुलुंड येथे असणारी प्रमुख डम्पिंग ग्राऊंड्स ही समुद्राच्या अगदी जवळ आहेत. या डम्पिंग ग्राऊंडवरील कचरा, प्लास्टिक विविध मार्गांनी वातावरणात आणि समुद्रात प्रवेश करत असते. वारा, पाऊस, पूर, भटके प्राणी, मानवी हस्तक्षेप यामुळे प्लास्टिक आणि कचरा वातावरणात प्रवेश करतो. डम्पिंग ग्राऊंड किंवा लॅण्डफिल्स, कचरा साठवणुकीची ठिकाणे पाणथळ जागांच्या जवळ असतील तर कचरा पसरण्याचे काम अधिक जास्त होते. वाऱ्याने उडून जाणारा कचरा हा सहज पाण्यातून वाहून जातो. यामुळे कचऱ्याचे वहन होतेच, तसेच पाण्याचे प्रदूषणही होते. किनारपट्टीजवळील शहरांमध्ये उष्णतेचे आणि वाऱ्याचे प्रमाण अधिक असते. अधिक उष्णतेने आग लागणे, अधिकच्या वाऱ्याने कचरा पसरणे, हे धोके या शहरांना असतात. यामध्ये मुंबईचा क्रमांक प्रथम आहे. मुंबई शहराची लोकसंख्येची घनता वाढत आहे. महानगरांतील नागरीक मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक वापरतात. कोविड–१९ च्या काळात एकवापर प्रणालीमुळे प्लास्टिकचा वापर अधिक वाढला. वापराच्या तुलनेत कचऱ्याचे व्यवस्थापन योग्य पद्धतीने झाले नाही. पर्यायाने प्रदूषणात वाढ झाली. भारतात दररोज साधारण २५ दक्षलक्ष पीपीई किट्स, जैववैद्यकीय कचऱ्यामध्ये १०१ टन प्लास्टिक आणि साधारण १४.५ टीपीडी प्लास्टिक कचरा निर्माण होतो. हा प्लास्टिकचा कचरा वातावरणात वाढणे अतिशय घातक आहे. डिसेंबर २०२२ मध्ये मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या माहितीनुसार जानेवारी ते डिसेंबर २०२१ मध्ये ४६ लाख, ९८ हजार, १६४ किलो केवळ प्लास्टिकच्या बाटल्या मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत सापडल्या होत्या. जानेवारी ते डिसेंबर २०२२ मध्ये यात वाढ झाली असून, ५८ लाख ९८ हजार ११४ किलो प्लास्टिक बाटल्या सापडल्या. तसेच वापरा आणि फेकून द्या प्रणालीतील कचरा हा अधिक आहे. कोरोना काळात यामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. जेवणाच्या प्लास्टिकच्या डीश, थाळ्या, ग्लास, चमचे, पिशव्या, वाट्या, कंटेनर, स्ट्रॉ, कप यामध्ये समावेश आहे. २०२१ मध्ये अशा प्रकारचा ६८ लाख, ८२ हजार, ६८९ किलो कचरा आढळला. २०२२ मध्ये त्याचे प्रमाण काहीसे कमी झालेले आहे. २०२२ मध्ये ६७ लाख, १२ हजार, ५५७ किलो प्लास्टिक कचरा आढळला आहे. २०२२ च्या उत्तरार्धात महानगरपालिकेने २ हजार, ९०६ किलो प्लास्टिक जप्त केले होते. परंतु कारवाया जास्त प्रमाणात होत नाहीत. प्लास्टिक बंदीबाबत कडक कायद्याची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. मुंबईत प्लास्टिक बंदी पुकारली की चार महिने कारवाया सुरू असतात, परंतु सातत्याने कारवाया होत नाहीत. त्यामुळे व्यापारी, दुकानदार आणि ग्राहक बिनधास्तपणे प्लास्टिक पिशव्या वापरतात. प्लास्टिक पिशव्यांमुळे मुंबईचे जनजीवन धोक्यात आहे. तसेच मुंबईलगत सागरी जीवन असुरक्षित बनले आहे. पावसाळ्यात गटारांत प्लास्टिक कचरा अडकून मुंबईची तुंबई होते. तरीही महापालिका व राज्य सरकारला जाग येत नाही, याचे आश्चर्य वाटते. प्लास्टिकच्या प्रदुषणामुळे अन्न, खाद्यपदार्थ दुषित होत आहेत. हे दुषित पदार्थ खाल्ल्याने मानवी जीवन रोगांचे आगार बनत आहे. प्लास्टिक एक हजार वर्ष टिकून राहते, त्यामुळे धोका अधिक आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबईमध्ये प्लास्टिकबंदीचे धोरण अनेकवेळा सत्तेवर आलेल्या राज्य सरकारांकडुन राबवले गेले. काही प्रमाणात हा प्रयोग यशस्वीही झाला, परंतु या अभियानात सातत्य नव्हते तर जाहिरातबाजी दिसुन आली. आज मुंबईत लोकसंख्येच्या तुलनेत प्लास्टिकवर नियंत्रण आणणे अवघड होत आहे. आजही मुंबईतील प्लास्टिकचा दररोजचा वापर साधारण ९ हजार टन एवढा आहे. अनेक लोक प्लास्टिक बॅग्ज एकदा वापरून टाकतात, यामध्ये पुनर्वापर करता येऊ शकणाऱ्या प्लास्टिक बॅग्जचाही समावेश आहे. मुंबई महानगरपालिकेच्या आकडेवारीनुसार, सॅनिटरी पॅड्स, डायपर यांच्यामुळे निर्माण होणारा कचरा हा एकूण कचऱ्याच्या ६ टक्के आहे. मुंबई महानगरपालिकेच्या अनेक भागांमध्ये लोक सॅनिटरी पॅड्स आणि डायपर गटारांमध्ये तसेच शौचालयांमध्ये टाकत असल्याचे आढळून येते. यामुळे पाणी तुंबण्याचे प्रमाण वाढते. आयआयटी खरगपूरने सादर केलेल्या अहवालानुसार, मुंबईतील डम्पिंग ग्राऊंड्स समुद्राजवळ असणे हे अत्यंत धोक्याचे आहे. या कचऱ्याचा मानवी जीवनावर तसेच, सागरी जीवांवर धोकादायक परिणाम होत आहे. प्लास्टिकचे लवकर विघटन होत नाही. तसेच ते जाळणेही वातावरणाच्या दृष्टीने हानीकारक आहे. नद्यांमध्ये, समुद्रात फेकणेही हानीकारक आहे. त्यामुळे प्लास्टिकचा अत्यावश्यक कारणासाठीच वापर करणे योग्य ठरेल. प्लास्टिक प्रदुषणाचे परिणाम स्लो पॉयझनसारखे आहे, त्यामुळे मानवाला प्लास्टिक प्रदुषणाबाबत गांभीर्य राहिलेले नाही. प्लास्टिकचे मानवी शरीरावर घातक परिणाम होत आहेत, शेतजमिनीवर पडलेल्या प्लास्टिकमुळे बीज उगवून येत नाही, गटारांत प्लास्टिक अडकल्याने महापूर येतो. असे असतानाही राज्य सरकार, महापालिका आणि नागरीक प्लास्टिक प्रदुषणाबाबत अनभिज्ञ आहेत, ही दुर्दैवी बाब आहे.

## पहिल्यांदा नोकरीला लागणाऱ्या तरुणांना १५ हजारांचा Incentive

**(पान १ वरून)** कौशल्य विकास – अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी घोषणा केलेल्या स्कीम बी योजनेचे प्रमुख उद्दिष्ट उत्पादन क्षेत्रातील रोजगार वाढवणे हे आहे. त्यासाठी पहिल्यांदा नोकरीला लागणारे तरुण आणि त्यांची कंपनी या दोघांनाही भविष्य निर्वाह निधीत जमा करणाऱ्या रक्कमेच्या हिशेबाने इन्सेन्टिव्ह देण्यात येईल. पहिले चार वर्ष संबंधित नोकरदार आणि संबंधित कंपनीला हा प्रोत्साहनपर भत्ता दिला जाईल.

**स्कीम सी योजना–** नव्याने नोकरीला लागणाऱ्या नोकरदारांना पाठिंबा देण्यासाठी केंद्र सरकारच्या रोजगार आणि कौशल्य विकास स्कीम सी अंतर्गत सर्व क्षेत्रातील नोकरदारांना प्रोत्साहनपर भत्ता दिला जाईल. एखादा तरुण पहिल्यांदा नोकरीला लागल्यानंतर त्याची कंपनी भविष्य निर्वाह निधीसाठी किती पैसे जमा करते, याआधारे संबंधित नोकरदाराला दोन वर्षे महिन्याला ३००० रुपयांपर्यंतची रक्कम परत केली जाईल. यामुळे ५० लाख अतिरिक्त रोजगार निर्माण होण्यास मदत होईल, असा दावा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केला.

## नीट–यूजी फेरपरीक्षा होणार नाही

**(पान १ वरून)** कामगिरी तितकीशी चांगली नसल्याचे आढळले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर अपलोड केलेल्या सूचीनुसार, सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. जे बी पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी होईल. 'नीट–यूजी' २०२४ प्रवेश परीक्षा रद्द करा, फेरपरीक्षा घ्या अशा मागण्या या याचिकांमध्ये करण्यात आल्या आहेत.

## बेवारस रुग्णांना अज्ञात स्थळी फेकणारे ससूनचे निर्दयी डॉक्टर अखेर निलंबित; दोघांवर गुन्हा दाखल

**(पान १ वरून)** आमदार धंगेकरांनी सुद्धा आज सकाळी पवार यांची भेट घेतली. संबंधित डॉक्टरांना निलंबन करण्याच्या मागणीचे निवेदन दिले. निलंबन झाले नाही तर उपोषणाला बसण्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला होता.

ससूनमध्ये याआधीही रुग्णांच्या जीवाशी खेळ झाले आहेत. अक्षरश काहींना तर जीव गमवावा लागला आहे. अनेक प्रकरणे तर दाबली गेली आहेत. आताच्या ललित पाटील आणि पोर्शे अपघात प्रकरणानंतर ससूनवर कारवाईचा बडगा उगारण्यास सुरुवात झाली आहे. त्यातच अशी माणुसकीला काळिमा फासणारी घटना समोर आली. या प्रकरणाशी संबंधित असणारे डॉक्टर, कर्मचारी तो रिक्षावाला यांच्यावर कारवाई होणार का? याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होऊ लागले होते. अशातच ससून रुग्णालय प्रशासनाने त्या डॉक्टरांचे निलंबन केले आहे.

# अर्थसंकल्पानंतर शिंदे सरकारचे ६ धडाकेबाज निर्णय!

मुंबई – राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. शिंदे–फडणवीस–पवार सरकारच्या राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत सरकारच्या वतीनं सहा महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. शिंदे–फडणवीस–पवार सरकारच्या (ड्हळपवश–ऋुवपरींळी–झुरुरी ऱ्हींशीपाशपीं) राज्य मंत्रिमंडळाची (डींरींश उरलळपशीं) मंत्रालयात आज बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील अनेक मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. आशा स्वयंसेविकांसाठी मंत्रिमंडळ बैठकीत महत्वाचा निर्णय घेतला आहे. ऑनड्यूटी असताना अपघात होऊन मृत्यू झाल्यास १० लाखांची तर कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास पाच लाखांची मदत देणार आहे. ५ एप्रिल २०२४ पासून योजना लागू केली आहे.

### मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय

■ **आशा स्वयंसेविका अपघाती मृत्यूसाठी दहा लाख, अपंगत्वासाठी पाच लाख**

राज्यातील आशा स्वयंसेविका यांच्यासाठी मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे, ऑन ड्युटी असताना अपघात होऊन मृत्यू झाला तर तात्काळ दहा लाखांची मदत तर कायमस्वरूपी अपंगत्व आलं तर पाच लाखांची मदत राज्य सरकार करणार आहे, अशा स्वयंसेविकांना सानुग्रह अनुदानाच्या संदर्भातला हा महत्वाचा निर्णय आहे. राज्यात एकुण ७५ हजार ५६८ आशा स्वयंसेवीका कार्यरत आहेत.

■ राजे यशवंतराव होळकर महामेष योजना पुढे सुरू ठेवणार

राज्यातील मेंढपाळांसाठी असलेली राजे यशवंतराव होळकर महामेष योजना पुढे सुरू ठेवण्याचा आणि मेंढपाळ लाभार्थींना रक्कम थेट खात्यात जमा करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. राज्यातील धनगर समाजातील मागासलेपण दूर करण्याच्या उद्देशाने ही योजना २०१७ वर्षापासून सुरु होती. या योजनेत अधिकाधिक लाभार्थींना फायदा व्हावा म्हणून काही बदलासह त्यास मान्यता देण्यात आली. या वर्षासाठी महामंडळाकडे असलेल्या २९ कोटी ५५ लाख इतका निधी चालू वित्तीय वर्षात खर्च करण्यास आणि त्यानंतर ही योजना दरवर्षी अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार पुढे चालू ठेवण्यात येईल. पशुधन खरेदीच्या बाबतीत ७५ टक्के अनुदानाची रक्कम ७ दिवसात थेट लाभ हस्तांतरण प्रक्रीयेतून (डीबीटी) लाभार्थींना देण्यात येईल. तसेच चारा बियाणे व बहुवार्षिक गवत प्रजातीचे ठोंबे व बियाणे यासाठीचे अनुदान वगळता उर्वरित सर्व लाभ डीबीटीच्या माध्यमातून लाभार्थींना देण्यात येतील.

■ **दिव्यांग कर्मचाऱ्यांना २०१६ पासून पदोन्नतीसाठी आरक्षण लागू**

राज्य शासनातील दिव्यांग कर्मचाऱ्यांसाठी ३० जून २०१६ पासून पदोन्नतीसाठी आरक्षण लागू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. गट ड ते गट अ च्या पदांमध्ये पदोन्नतीमध्ये ४ टक्के आरक्षण ३० जानेवारी २०१६ पासून लागू करण्यात येत आहे. याचा लाभ काल्पनिक पद्धतीने गट अ च्या निम्न स्तरापर्यंत मिळेल. ३० जून २०१६ पासून ज्या दिनांकाला दिव्यांग अधिकारी किंवा कर्मचारी पदोन्नतीसाठी पात्र ठरेल त्या दिनांकापासून त्यांना काल्पनिकरित्या आरक्षणाचा लाभ देण्यात येईल. पदोन्नतीचा प्रत्यक्ष आर्थिक लाभ त्यांना प्रत्यक्षात पदभार स्वीकारल्याच्या तारखेपासून लागू होईल. या निर्णयामुळे पदोन्नती साखळीतील अंतर्गत ज्येष्ठतेवर परिणाम होण्याच्या शक्यतेमुळे गैरसोय टाळण्यासाठी ३० जून २०१६ नंतर मान्यता देण्यात आलेल्या प्रत्येक निवडसूचीतील पद संख्येनुसार आणि २० एप्रिल २०२३ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रत्येक शासकीय आस्थापनेने दिव्यांग आरक्षणाची गणणा करावी. तसेच पात्र दिव्यांगांची संख्या पुरशी नुसल्यास अधिसंख्य पद निर्माण करावे असे देखील ठरले.

■ शेती पिकांचे नुकसान ठरविण्यासाठी अद्ययावत प्रणाली लवकरात लवकर विकसित करणार

शेती पिकांचे नुकसान ठरविण्यासाठी लवकरात लवकर अद्ययावत प्रणाली विकसित करावी जेणेकरून ही नुकसान भरपाई अधिक पारदर्शकतेने व अचूकपणे देता यावी असा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. ही प्रणाली सुरु होईपर्यंत प्रचलित पद्धतीने नुकसान भरपाईची मदत देण्यात येईल. १ जुलै २०२४ रोजी यासंदर्भात झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत सामान्यकृत फरक वनस्पती निर्देशांक (एनडीव्हीआय) निकषासाठी पूर्ण अद्ययावत प्रणाली कृषी विभागामार्फत तयार होत नाही तोपर्यंत प्रचलित धोरणांप्रमाणे शेती पिकांना नुकसान भरपाई देण्याबाबत निर्णय झाला होता.

■ **बृहन्मुंबईमध्ये न्यायिक अधिकाऱ्यांसाठी ५१ सदनिका**

बृहन्मुंबईमध्ये न्यायिक अधिकाऱ्यांसाठी ५१ सदनिका भाडे तत्वावर उपलब्ध करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. माझगाव येथील पारिजात इमारतीत १६, केदार इमारतीतील ३ अशा १९ न्यायिक अधिकाऱ्यांना आणि नव्याने निर्माण झालेल्या पदांच्या अनुषंगाने ३२ अशा ५१ सदनिका ऑक्टोबर २०२४ ते ऑक्टोबर २०२७ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर घेण्यात येतील. एका सदनिकेचे १ महिन्याचे कमाल भाडे १लाख २० हजार असून त्यामुळे ५१ सदनिकेसाठी एका वर्षाच्या ५१ कोटी ३४ लाख ४० हजार इतक्या भाडे खर्चास मान्यता देण्यात आली.

■ **नाशिक जिल्ह्यातील अंबडमध्ये एमआयडीसीसाठी १६ हेक्टर शासकीय जमीन**

नाशिक जिल्ह्यातील मौ.अंबड येथे एमआयडीसीला विस्तारीकरणासाठी १६ हेक्टर शासकीय जमीन विनामुल्य दरात उपलब्ध करून देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या जमिनीची किंमत २४ कोटी २ लाख ४० हजार इतकी असून ती विनामुल्य एमआयडीसीला हस्तांतरीत करण्यात येईल.

## अर्थसंकल्पावरील प्रतिक्रिया....

### बजेटवर काय म्हणाले उद्धव ठाकरे

''पंतप्रधान मोदींनी 'नावडता महाराष्ट्र' ही योजना सुरू केलेली दिसते. गेल्या दहा वर्षांत महाराष्ट्र ओरबाडला व मुंबईची लूट केली, पण प्रत्येक बजेटमध्ये महाराष्ट्राची निराशाच केली. महाराष्ट्राने आणखी किती अन्याय सहन करायचा? पण दिल्लीचे बूट चाटणारे घटनाबाह्य सरकार बसले आहे, तोपर्यंत हा अन्याय सुरूच आहे. घटनाबाह्य सरकारची किंमत महाराष्ट्राला मोजावी लागत आहे !'', अशी संतापजनक प्रतिक्रिया उद्ध ठाकरेंनी आजच्या एनडीए सरकारने सादर केलेल्या बजेटवर दिली आहे. दरम्यान, उद्धव ठाकरेंच्या टीकेला भाजपनेही ट्विट करुन प्रत्युत्तर दिलंय. त्यामध्ये, महाराष्ट्राला या बजेटमधून नेमकं काय मिळालं, याची माहितीच भाजपने दिलीय.

### पायाभूत सुविधांसाठी मोठी गुंतवणूक : देवेंद्र फडणवीस

देवेंद्र फडणवीस म्हणाले, पायाभूत सुविधांसाठी मोठी गुंतवणूक करण्यात आली आहे. ११ लाख कोटींची गुंतवणूक करण्यात आली आहे. मुद्रा लोन १० लाख वरून आता २० लाख पर्यंत वाढवण्यात आलं आहे. इन्कम टॅक्समध्ये मध्यमवर्गीय कुटुबांना फायदा होणार आहे. केवळ घोषणा न करता भविष्याचा वेध घेत ही घोषणा करण्यात आली. **विरोधकांनी राजकारण करू नये : देवेंद्र फडणवीस** – विनाकारण नरेटिव्ह तयार करण्याचा प्रयत्न होतो ते तुमच्या समोर आहे. माझा विरोधकांना सल्ला आहे फक्त नरेटिव्ह सेट करण्यासाठी राजकारण करू नका. महाराष्ट्राला देखील अनेक गोष्टी मिळाल्या आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### केंद्राचं नवरत्न बजेट, मुख्यमंत्र्यांनी उधळली स्तुतीसुमनं

कररचनेत मोठे बदल करून सर्वसामान्यांना दिलासा देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोट्यवधी देशवासियांचा विश्वास सार्थ ठरविला. केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी मांडलेला हा अर्थसंकल्प शेतकरी, महिला, युवा, कौशल्य विकास, रोजगार, पायाभूत सुविधांची उभारणी, शहरांचा विकास अशा विविध नऊ घटकांवर लक्ष केंद्रीत करणारा नवरत्न अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया व्यक्त करतानाच युवकांच्या कल्याणासाठी भरीव तरतूद, रोजगाराला चालना देणारा आणि 'विकसित भारत' संकल्पनेला बळ देणारा असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले

Public Trusts Registration Office, Greater Mumbai Region
Address: Public Trust Registration Office, GBR, 1st Floor, Sasmira Building, Sasmira Road, WorliMumbai, Mumbai, Mumbai

**Public Notice**

Service Request Number : GBR/14575/18/23
Inquiry/case No. : ACC/ X/ 209/2024
Name of the Trust : SHRI GAGANANDA SEVA PRATISHTHAN
**Address of the Trust : C/o. Shri. Pandhari Khandu Koli, Manori Koliwada, Pandhari House, Marve Road, Madhli Galli, Monorigaon, Malalad West, Mumbai, Mumbai, Mumbai, Mumbai**
**Registration Number of the Trust (if)** : SHRI GAGANANDA SEVA PRATISHTHAN

**Name of the Applicant :** Popat Ramakrishna Shinde

To
**All Concerned having interest**

Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Greater Mumbai Region.
1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 18/07/2024.

Copy:- 1) On address of the property mentioned above.
2) On Address of the Trust.
3) For publication in Local Daily News Paper.
4) On Notice Board of this Office
5) (if any Other Please mentioned).... ......
(Note: Please ✓ mark the appropriate option)

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Greater Mumbai Region

## 'सुवर्ण'संधी... सोने मुंबईत ५ हजार, पुणे, जळगावात ३ हजाराने स्वस्त

मुंबई : केंद्र सरकारचा यंदाच्या लोकसभा हंगामातील पहिला अर्थसंकल्प आज अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी सादर केला. त्यानंतर, सर्वांनाच उत्सुकता असलेल्या मौल्यवान वस्तुंच्या किंमतीत मोठी घसरण झाली आहे. त्यातच, सोन्याच्या दरात तब्बल ५ हजार रुपयांनी कमी झाला आहे. कस्टम ड्युटी तात्काळ प्रभावाने लागू होत असते, त्यामुळे अर्थमंत्री सितारमण यांनी बजेट सादर केल्यानंतर कस्टम ड्युटी कमी करुन ग्राहकांना सुवर्णसंधीच दिली आहे. त्यानुसार, राजधानी मुंबईत सोन्याचे दर तब्बल ५ हजार रुपयांनी कमी झाले आहेत. तर, पुणे आणि जळगाव शहरातही ३ हजार रुपयांनी प्रतितोळा सोने दरात घट झाल्याने ग्राहकांमध्ये आनंदी आनंद पाहायला मिळत आहे. गेल्या काही महिन्यांपासून सोन्याचा दरात मोठी वाढ होत असल्याचे पाहायला मिळालं. त्यामुळे, ग्राहकांनी सोनं खरेदीकडे पाठ फिरवली होती. आता, दर कमी झाल्यामुळे पुन्हा सोन्याच्या दुकाना ग्राहकांची गर्दी दिसून येईल.

सोनं हे सौभाग्याचं लेणं आणि एक भावनिक दागिना म्हणून हिंदू संस्कृतीत मानलं जातं. त्यामुळेच, कुटुंबातील मोठ्या कार्यक्रमात, शुभ कार्यात सोनं खरेदी केली जाते. विशेष म्हणजे साडेतीन मुहूर्तांवर सोनं खरेदी करण्याचीही प्रथा, परंपरा आजही जपली जाते. गुढी पाडवा, दसरा, दिवाळी, अक्षय तृतीया या दिवशी सराफ बाजारात ग्राहकांची चलती असते. त्यातच, लगीन सराईही सोनं खरेदीचा सुवर्णकाळ असतो. मात्र, गेल्या काही महिन्यात सोन्याच्या दरातील वाढ, पाहता ग्राहकांनी पाठ फिरवल्याचं दिसून आलं. मात्र, आजच्या बजेटमधील निर्णयामुळे पुन्हा ग्राहकांना सोनं खरेदीची सुवर्णसंधी निर्माण झाली आहे.

सोन्याची स्टॅम्प ड्युटी कमी करण्यात आली आहे, ती ९ टक्क्यांवर खाली आली आहे. तसेच, जीएसटी व सेल्स टॅक्स मिळून कमीत कमी ६ टक्क्यांपर्यंत स्टॅम्प ड्युटी कमी झाली आहे. त्यामुळे, मुंबई ५ हजार रुपयांनी सोने स्वस्त झालं आहे. २२ कॅरेट सोन्याच्या भावात ५ हजार रुपयांची घट झाल्याचं गोल्ड असोसिएशनचे प्रवक्ते आणि मुंबईतील सुवर्ण व्यापारी कुमार जैन यांनी सांगितलं. आता लगीन सराईचा सिझन आहे, त्यामुळे सोनं खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी होईल. सध्या पावसाळा असल्याने आणि सोन्याचे दर वाढल्याने सर्वसामान्य नागरिकांनी सोन्याकडे पाठ फिरवली होती. मात्र, या निर्णयामुळे सोने खरेसाठी चांगली संधी मिळाली आहे. त्यातच, लगीन सराई सुरू होणार असल्याने आता सोनं खरेदी करुन ग्राहकांनी सुवर्ण संधीचा लाभ घेतला पाहिजे, ससेही कुमार जैन यांनी एबीपी माझाशी बोलताना म्हटले. तसेच, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सोन्याचे दर २४८५ डॉलर होते, ते आता २४०७, २४०५ डॉलरपर्यंत खाली आले आहेत. त्यामुळेही सोन्याच्या दरात मोठी घट झाल्याचं कुमार जैन यांनी सांगितले.

दरम्यान, मुंबई, पुणे, जळगाव या प्रमुख शहरांसह राज्यातील सर्वच शहरात, गावांत सोन्याच्या दरात मोठी कपात झाली आहे. त्यामुळे, आपल्या परिसरातील सुवर्णपेढीत जाऊन किंवा ओळखीच्या ज्वेलर्सकडून तुम्ही आजचे सोन्याचे दर जाणून घेऊ शकता.

## ठाण्यात काँग्रेसच्या बैठकांना जोर....

ठाणे – येत्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाण्यातील काँग्रेसला नवसंजीवनी देण्यासाठी बैठकसत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. २३ जुलै ते १५ ऑगस्ट या काळात जिल्हा व ब्लॉक स्तरावरील बैठका घेण्यात येणार असून, विधानसभा निवडणुकांच्या दृष्टीने वातावरणनिर्मिती व नियोजनाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील नेते व पदाधिकारी या बैठकांना उपस्थित राहणार आहेत. ठाणे जिल्हयात काँग्रेस विविध गटातटांमध्ये विभागली आहे. लोकसभा निवडणुकीत भिवंडीच्या जागेवर काँग्रेसला पाणी सोडावे लागले. त्यानंतर आगामी विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यात काँग्रेसला प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळावी, या हेतूने बैठकांचे नियोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पाटोले यांच्या सूचनेनुसार स्थानिक नेते व पदाधिकाऱ्यांना कार्यक्रम आखून देण्यात आला आहे. यामध्ये २३ जुलै रोजी जिल्हास्तरावर जिल्हा काँग्रेस कमिटी कार्यकारणी, जिल्ह्यातील प्रदेश पदाधिकारी आणि जिल्हाप्रभारी यांची बैठक घेतली जाणार आहे. २५ ते ३० जुलैदरम्यान ब्लॉक स्तरावर ब्लॉक काँग्रेस कमिटी कार्यकारणी, ब्लॉकमधील जिल्हा पदाधिकारी व जिल्हा प्रभारी यांची बैठक होणार आहे. तसेच १ ते १० ऑगस्टदरम्यान जिल्ह्यातील बूथ कमिट्या व बी. एल. ए यांची व ५ ते १५ ऑगस्ट काळात आघाडी संघटना, विभाग आणि सेल यांची बैठक होणार असल्याचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष नाना गावंडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM **VAISHALI SADASHIV TANDEL TO VAISHALI YOGESH JADHAV** AS PER GAZETTE (M-24116217). RESIDING AT TANDEL NIWAS, VITAWA, KOLIWADA, BANDARPADA, SHIVAJI CHOWK, BELAPUR ROAD, KALWA, THANE WEST

**नवी मुंबई महानगरपालिका**

**शहर अभियंता विभाग**

**निविदा सुचना क्रमांक-नमुंमपा/कार्यकारी अभियंता(TBR)/33/2024**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | ठाणे-बेलापुर रस्त्यावर रिलायबल प्लाझा ते टाईम्स ऑफ इंडीया पर्यंत साफसफाई करणेकरीता मजुर पुरविणे. | 2,97,552 |
| 2 | ठाणे-बेलापुर रस्त्यावर टी-जंक्शन ते भारत बिजली सिग्नल पर्यंत साफसफाई करणेकरीता मजुर पुरविणे. | 2,97,552 |
| 3 | ठाणे-बेलापुर रस्त्यावर रिलायबल प्लाझा ते टाईम्स ऑफ इंडीया पर्यंत साफसफाई करणेकरीता मजुर पुरविणे. | 2,97,552 |

**मोहोरबंद संपूर्ण निविदा दिनांक 24/ 07/2024 रोजीपासून नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय आवक जावक कक्ष, तळ मजला, प्लॉट नं 1 व 2 , गोवर्धनी चौक, सेक्टर 15ए,सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथील पेटीत टाकण्यात याव्यात. कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.**

सही/-
**कार्यकारी अभियंता (TBR)**
**नवी मुंबई महानगरपालिका**
**जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/102/2024**

**कल्याण डोबिवली महानगरपालिका, परिवहन उपक्रम, कल्याण.**

मुख्य कार्यालय – शंकरराव चौक, कल्याण (पश्चिम) पिन – ४२१ ३०१

**–: शुध्दीपत्रक :–**

कल्याण डोबिवली महानगरपालिका परिवहन उपक्रमाने निविदा सुचना क्रमांक ०१/२०२४–२०२५ नुसार महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in/nicgep/app या संकेत स्थळावर निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर निविदेच्या दिनांक २२/०७/२०२४ रोजी घेणेत आलेल्या निविदापुर्व बैठकीच्या अनुषंगाने परिवहन उपक्रमाने घेतलेले उचित निर्णयाबाबतचे निविदापुर्व बैठकीचे इतिवृत्त महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in/nicgep/app या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेले आहे.

जा. क्र. कडोंमपा/जसंवि/मुका/१४६८
दि. २३/०७/२०२४

सही/–
(डॉ. दिपक सावंत)
परिवहन व्यवस्थापक
कल्याण डोंबिवली महानगरपालिका
परिवहन उपक्रम, कल्याण


## भारतीय सैन्य दल

■ पदाचे नाव तपशील:
पद क्र. पदाचे नाव पद संख्या
१ हवालदार – २ नायब सुभेदार –
■ क्रीडा पात्रता: ऍथलेटिक्स, तिरंदाजी बास्केटबॉल बॉक्सिंग, डायव्हिंग, फुटबॉल, तलवारबाजी, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, हँडबॉल, कबड्डी. ज्यांनी वर नमूद केलेल्या कोणत्याही खेळ आणि खेळांमध्ये खालीलप्रमाणे प्रतिनिधित्व केले आहे:- (E) व्यक्ती राष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करून कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर पदक विजेता असावी किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर (इंडल इव्हेंट) देशाचे प्रतिनिधित्व केले असेल. (ab) व्यक्तीने कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर (सांघिक स्पर्धा) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्य किंवा देशाचे प्रतिनिधित्व केलेले असावे. (ac) वैयक्तिक खेळो इंडिया गेम्स आणि युथ गेम्समध्ये पदक विजेता असावा.
■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: १०वी उत्तीर्ण
पद क्र.२: १०वी उत्तीर्ण
■ वयाची अट: जन्म ०१ ऑक्टोबर १९९९ ते ३० सप्टेंबर २००६ दरम्यान झालेला असावा.
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: Directorate of PT Sports General Staff Branch IHQ of MoD (Army) Room No 747 "A' Wing, Sena Bhawan PO New Delhi -110 011
■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ वेबसाईट https://www.indianarmy.nic.in/

## स्टाफ सिलेक्शन कमिशन

■ Total: १७७२७ जागा
■ परीक्षेचे नाव: SSC संयुक्त पदवीधर स्तर परीक्षा २०२४
■ पदाचे नाव तपशील:
१ असिस्टंट सेक्शन ऑफिसर
२ असिस्टंट/असिस्टंट सेक्शन ऑफिसर
३ इस्पेक्टर ऑफ इनकम टॅक्स
४ इन्स्पेक्टर
५ असिस्टंट एनफोर्समेंट ऑफिसर
६ सब इंस्पेक्टर
७ एक्झिक्युटिव असिस्टंट
८ रिसर्च असिस्टंट
९ डिविजनल अकाउंटेंट
१० सब इंस्पेक्टर (CBI)
११ सब इंस्पेक्टर/जुनियर इंटेलिजन्स ऑफिसर
१२ कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी
१३ ऑडिटर
१४ अकाउंटेंट
१५ अकाउंटेंट /ज्युनियर अकाउंटेंट
१६ पोस्टल असिस्टंट / सॉर्टिंग असिस्टंट
१७ वरिष्ठ सचिवालय सहाय्यक / उच्च श्रेणी लिपिक
१८ सिनियर एडमिन असिस्टंट
१९ कर सहाय्यक
२० सब-इस्पेक्टर (NIA)
■ शैक्षणिक पात्रता:
कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी: पदवी व १२वीत गणितामध्ये किमान ६०% गुण किंवा सांख्यिकीसह कोणत्याही विषयात पदवी.
■ उर्वरित पदे: कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: २० ते ३० वर्षे, १८ ते ३० वर्षे
पद क्र.२, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, ११: १८ ते ३० वर्षे
पद क्र.१०: २० ते ३० वर्षे
पद क्र.१२: १८ ते ३२ वर्षे
पद क्र.१३ ते २०: १८ ते २७ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: 100/- SC/ST/PWD
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २४ जुलै २०२४ (११:०० PM)
Tier I परीक्षा: सप्टेंबर/ऑक्टोबर २०२४
Tier II परीक्षा: डिसेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://ssc.gov.in/

■ जागा : १५२
■ पदाचे नाव तपशील:
१ विद्याशाखांचे डीन
२ प्राध्यापक
३ सहयोगी प्राध्यापक / उप ग्रंथपाल
४ सहयोगी प्राध्यापक / सहयोगी ग्रंथपाल
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) संबंधित विषयात Ph.D. /55% गुणांसह पदव्युत्तर पदवी (ii) पुस्तके आणि संशोधन/पॉलिसी पेपर म्हणून १० प्रकाशने. (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) संबंधित विषयात Ph.D. (ii) पुस्तके आणि संशोधन/पॉलिसी पेपर म्हणून १० प्रकाशने. (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.३: संबंधित विषयात Ph.D+५५% गुणांसह पदव्युत्तर पदवी+ पुस्तक ०७ प्रकाशने+ ०८ वर्षे अनुभव+NET/SET किंवा ग्रंथालय विज्ञान/माहिती विज्ञान/दस्तऐवजीकरण विज्ञान पदव्युत्तर पदवी + ०८ वर्षे अनुभव
पद क्र.४: ५५% गुणांसह पदव्युत्तर पदवी+NET/SET किंवा ग्रंथालय विज्ञान/माहिती विज्ञान/दस्तऐवजीकरण विज्ञान पदव्युत्तर पदवी
■ नोकरी ठिकाण: मुंबई
■ Fee: खुला प्रवर्ग: ५००/- मागासवर्गीय: २५०/-
■ भरलेले अर्ज सादर करण्याचा पत्ता: The Registrar, University of Mumbai, Room No. 25, Fort, Mumbai-400032
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०७ ऑगस्ट २०२४
■ वेबसाईट https://mu.ac. in/




## महाराष्ट्र अग्निशमन सेवा

■ उपलब्ध पाठ्यक्रम (कोर्स):
अ. क्र. कोर्सचे नाव पद संख्या कालावधी
१ अग्निशामक (फायरमन) कोर्स – ०६ महिने
२ उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी कोर्स ४० ०१ वर्षे
■ शैक्षणिक पात्रता:
अग्निशामक (फायरमन): ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण SC/ST/NT/VJNT/SBC/OBC/EWS: ४५%गुण
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी: ५०% गुणांसह पदवीधर SC/ST/NT/VJNT/SBC/OBC/EWS: ४५%गुण
■ शारीरिक पात्रता:
कोर्सचे नाव उंची वजन छाती
अग्निशामक (फायरमन) १६५ सें.मी. ५० kg ८१/८६ सें.मी
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी १६५ सें.मी. ५० kg ८१/८६ सें.मी
■ वयाची अट: १५ जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC/EWS: ०३ वर्षे सूट
अग्निशामक (फायरमन): १८ ते २३ वर्षे
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी: १८ ते २५ वर्षे
■फी : कोर्सचे नाव खुला प्रवर्ग राखीव प्रवर्ग
अग्निशामक (फायरमन) ६००/- ५००/-
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी ७५०/- ६००
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ ऑगस्ट २०२४
शैक्षणिक कागदपत्रांची तपासणी व शारीरिक पात्रता पडताळणी: २३ सप्टेंबर २०२४ पासून
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://mahafireservice.gov.in/

## भारतीय हवाई दल

■ पदाचे नाव तपशील:
१ अग्निवीरवायु इनटेक
■ शैक्षणिक पात्रता: ५०% गुणांसह १२वी उत्तीर्ण (Mathematics, Physics and English) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics / -utomobile / Computer Science / Instrumentation Technology / Information Technology) किंवा गैर-व्यावसायिक विषयासह दोन वर्षांचा व्यावसायिक अभ्यासक्रम उदा. Physics and Mathematics. किंवा ५०% गुणांसह १२वी उत्तीर्ण + ५०% गुणांसह इंग्रजी.
■ शारीरिक पात्रता:
उंची/छाती पुरुष महिला
उंची १५२.५ सेमी १५२ से.मी.
छाती ७७ से.मी./किमान ०५ सेमी फुगवून.
■ वयाची अट: जन्म ०३ जुलै २००४ ते ०३ जानेवारी २००८ दरम्यान.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: ५५०/- + GST
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: २८ जुलै २०२४
■ परीक्षा: १८ ऑक्टोबर २०२४ पासून
■ अधिकृत वेबसाईट https://indianairforce.nic.in/

## भारतीय स्टेट बँक

■ पदाचे नाव तपशील:
१ सेंट्रल रिसर्च टीम (Product Lead)
२ सेंट्रल रिसर्च टीम (Support)
३ प्रोजेक्ट डेवलपमेंट मॅनेजर (Technology)
४ प्रोजेक्ट डेवलपमेंट मॅनेजर (Business)
५ रिलेशनशिप मॅनेजर
६ तझ वेल्थ
७ रिलेशनशिप मॅनेजर (Team Lead)
८ रीजनल हेड
९ इन्वेस्टमेंट स्पेशलिस्ट
१० इन्वेस्टमेंट ऑफिसर
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) MBA/PGDM/PGDBM/C-/CF- (ii) ०५ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) पदवी/पदव्युत्तर पदवी (Commerce/ Finance/ Economics/Management/ Mathematics/Statistics) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) MBA/MMS/PGDM/ME/M.Tech./BE/B.Tech./PGDBM² (ii) ०४ वर्षे अनुभव
पद क्र.४: (i) MB-/PGDM/PGDBM² (ii) ०५ वर्षे अनुभव
पद क्र.५: (i) पदवीधर (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) पदवीधर. (ii) ०६ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) पदवीधर. (ii) ०८ वर्षे अनुभव
पद क्र.८: (i) पदवीधर. (ii) १२ वर्षे अनुभव
पद क्र.९: (i) MBA/PGDM/PGDBM/CA/ CFA (ii) NISM 21- प्रमाणपत्र (iii) ०६ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) MA/PGDM/PGDBM/CA/ CFA (ii) NISM 21- प्रमाणपत्र (iii) ०४ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ एप्रिल २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: ३० ते ४५ वर्षे
पद क्र.२: २५ ते ३५ वर्षे
पद क्र.३: २५ ते ४० वर्षे
पद क्र.४: ३० ते ४० वर्षे
पद क्र.५: २३ ते ३५ वर्षे
पद क्र.६: २६ ते ४२ वर्षे
पद क्र.७: २८ ते ४२ वर्षे
पद क्र.८: ३५ ते ५० वर्षे
पद क्र.९: २८ ते ४२ वर्षे
पद क्र.१०: २८ ते ४० वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/EWS: 750/- SC/ST/OBC/PWD: फी नाही
■ अधिकृत वेबसाईट https://sbi.co.in/

## भारतीय सैन्य एनसीसी स्पेशल एंट्री स्कीम

■ कोर्सचे नाव: NCC स्पेशल एंट्री स्कीम एप्रिल २०२५-५७ कोर्स
पदाचे नाव तपशील:
१ NCC स्पेशल एंट्री (पुरुष) ७०
२ NCC स्पेशल एंट्री (महिला) ०६
■ शैक्षणिक पात्रता:
NCC "C' Certificate Holders: (i) ५०% गुणांसह पदवीधर (ii) ०२ वर्षे NCC मध्ये सेवा (iii) NCC प्रमाणपत्र.
Ward of Battle Casualties of Army Personnel: ५०% गुणांसह पदवीधर.
वयाची अट: जन्म ०२ जानेवारी २००० ते ०१ जानेवारी २००६ दरम्यान.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ फी : फी नाही.
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०९ ऑगस्ट २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://indianarmy.nic.in/

# गाडीच्या प्रवासात मळमळ, उलटी होत असेल तर लिंबू जवळ ठेवाच!

पावसाळ्यात गाडी काढावी आणि मस्त दूरच्या सफरीवर सहलीसाठी जावं अशी अनेकांची इच्छा असते. घाटात प्रवास करताना आजूबाजूने कोसळणारे धबधबे पाहण्याची मज्जा काही औरच असते. एखाद्या मस्त व्ह्यू पॉईंटला जाऊन भजी, मॅगी खावी असा विचार करूनच तोंडाला पाणी सुटतं. पण जर एखाद्याला मोशन सिकनेसचा म्हणजेच गाडीत बसल्यावर मळमळ उलटीचा त्रास होत असेल तर पिकनिक राहिली बाजूला उलट प्रवास म्हणजे अक्षरशः वाईट अवस्था होते. याच मोशन सिकनेसवर लिंबाच्या रसाचा सुगंध कशी मदत करू शकतो हे आता आपण जाणून घेणार आहोत.

### लिंबाच्या रसाचा फायदा

स्पर्श हॉस्पिटलच्या गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी विभागाचे वरिष्ठ सल्लागार, डॉ. प्रणव होन्नावरा श्रीनिवासन यांनी इंडियन एक्सस्प्रेसला सांगितले की, मोशन सिकनेस म्हणजेच गाडी लागणे/गाडीत मळमळ, उलट्या होणे याचे प्रमाण कमी करण्यासाठी लिंबाच्या रसाचा सुगंध मदत करू शकते. लिंबूवर्गीय फळांचा सुगंध हा मध्यवर्ती मज्जासंस्थेला शांत करू शकतो. लिंबाच्या रसामध्ये लिमोनेन आणि सायट्रल सारखी संयुगे असतात, ज्यांचा मूडवर प्रभाव पडतो आणि मळमळ कमी करण्यास मदत होते. डॉ. होन्नावरा असेही सांगतात की, श्वास घेताना लिंबाच्या रसातील ही संयुगे घाणेंद्रियाला उत्तेजित करू शकतात, ज्यामुळे मळमळीपासून आराम मिळतो. लिंबाच्या रसाचा ताजा आणि स्फूर्तिदायक सुगंध मोशन सिकनेसमुळे येणाऱ्या अस्वस्थतेपासून मेंदूचे लक्ष विचलित करून मळमळ होण्याची शक्यता कमी करू शकतो.

### लिंबाच्या रसाचा फायदा मळमळ थांबवण्यासाठी होतो याचा पुरावा काय?

डॉ. श्रीनिवासन यांनी ठामपणे सांगितले की, या विशिष्ट उपायावरील वैज्ञानिक संशोधन मर्यादित आहे. पण अनेक अभ्यासांमध्ये लिंबाच्या रसाचा प्रभाव मान्य करण्यात आला आहे. उदाहरणार्थ, काही संशोधनात असे दिसून आले आहे की लिंबाचा अर्क असलेल्या सुगंधी तेलाचा वास घेतल्याने पोस्टऑपरेटिव्ह (शस्त्रक्रियेनंतर) रूग्णांमध्ये मळमळ आणि उलट्या कमी होऊ शकतात, ज्यामुळे मोशन सिकनेससाठी देखील याचा फायदा होण्याची शक्यता असते. लिंबाच्या तेलाचे अँटी बॅक्टरीअल व अँटी इन्फ्लेमेंटरी गुणधर्म सुद्धा त्याची प्रभावी क्षमता वाढवू शकतात. मात्र हे फायदे सिद्ध होण्यासाठी अधिक क्लिनिकल तपासण्या होण्याची गरज आहे.

### लिंबाच्या रसाचा सुगंध इतर उपायांच्या तुलनेत किती प्रभावी आहे?

डॉ. श्रीनिवासन यांनी सांगितले की, आल्याचे सेवन किंवा ऍक्युप्रेशर बँड सारख्या उपायांच्या तुलनेत लिंबाच्या रसाचा उपाय वेगळा ठरतो. आल्यातील अँटीमेटिक गुणधर्म मळमळ व उलट्या कमी करण्यासाठी मदत करू शकतात. आलं आतड्यांमधील सेरोटोनिन रिसेप्टर्सना अवरोधित करते ज्यामुळे मोशन सिकनेस कमी होण्यास मदत होऊ शकते. तर, एक्यूप्रेशर बँड हा मनगटावरील झ६ (नेगुआन) बिंदूवर दाब देतो, ज्यामुळे मज्जातंतूंना उत्तेजना मिळून मळमळ कमी होते असे मानले जाते. या दोन्ही उपायांच्या तुलनेत लिंबाच्या रसाचा प्रभाव लवकरात लवकर दिसू शकतो. आलं बायोकेमिकल मार्गाने प्रभाव दाखवतं तर ऍक्युप्रेशर बँड शारीरिक मार्गाने प्रभावी ठरतं, दोन्ही पद्धतीचे प्रभाव हे वैयक्तिक संवेदनशीलता व प्राधान्यानुसार बदलू शकतात.

### लिंबाच्या रसाच्या वापराचे काही तोटे आहेत का?

मोशन सिकनेसवर उपचार म्हणून लिंबाच्या रसाचा सुगंध घेणे हा सामान्यतः सुरक्षित मानले जाते. डॉ. श्रीनिवासन यांनी सुद्धा याची पुष्टी केली. मात्र लिंबूवर्गीय फळांची ऍलर्जी असलेल्या व्यक्तींनी प्रतिक्रिया टाळण्यासाठी हा उपाय टाळावा. याव्यतिरिक्त, लिंबूवर्गीय सुगंधांच्या दीर्घकाळापर्यंत संपर्कात आल्याने काहींना डोकेदुखी किंवा श्वसनाचा त्रास होऊ शकतो. कृत्रिम सुगंधापेक्षा नैसर्गिक लिंबाचा रस किंवा तेल वापरावे. अचानक होणारा त्रास टाळण्यासाठी कोणतेही उपाय करण्याआधी आपल्या डॉक्टरांचा सल्ला आवर्जून घ्या.

### कर्णधार चमारीचे विक्रमी शतक

# श्रीलंकेची उपांत्य फेरीत धडक

नवी दिल्ली : श्रीलंकेत खेळल्या जात असलेल्या महिला आशिया कपमध्ये यजमान संघाने नेत्रदीपक कामगिरीच्या जोरावर मलेशियाविरुद्ध १४४ धावांनी मोठा विजय नोंदवला आहे. प्रथम फलंदाजी करताना कर्णधार चमारी अटापट्टूच्या झंझावाती शतकी खेळीच्या जोरावर श्रीलंकेनं ४ विकेट गमावून १८४ धावसंख्येपर्यंत मजल मारली आहे. प्रत्युत्तरात लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेला मलेशियाचा संघ अवघ्या ४० धावांत गडगडला.
या विजयासह श्रीलंकेने आपल्या गटातील दुसरा विजय मिळवून उपांत्य फेरीतील आपले स्थान जवळपास निश्चित केले आहे. त्यांनी त्यांच्या पहिल्या सामन्यात बांगलादेशचा पराभव केला होता आणि सोमवारी(दि.२२ जुलै) त्यांनी मलेशियाचा पराभव केला आहे, तर मलेशियाचा संघ या पराभवासह स्पर्धेतून जवळपास बाहेर पडला आहे.
यजमान श्रीलंकेने सोमवारी महिला आशिया चषक स्पर्धेत मलेशियाविरुद्ध अप्रतिम खेळ केला. आशिया कप टी-२० च्या इतिहासातील सर्वात मोठा विजय नोंदवून खळबळ उडवून दिली. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला आलेल्या श्रीलंकेला अवघ्या ५ धावांवर पहिला धक्का बसला पण यानंतर कर्णधाराने ११९ नाबाद धावांची तुफानी खेळी खेळून सामन्याचा नकाशाच बदलून टाकला.
श्रीलंकेची कर्णधार चमारी अटापट्टू आशिया कप टी-२० च्या इतिहासात शतक झळकावणारी पहिली खेळाडू ठरली आहे. तिने ६३ चेंडूत शतक पूर्ण केले तर ६९ चेंडूत १४ चौकार आणि ७ षटकारांच्या मदतीने ११९ धावांची अप्रतिम खेळी केली. याव्यतिरिक्त हर्षिता समरविक्रमाने २६ धावांची तर अनुष्का संजीवनीने ३१ धावांची खेळी खेळली.
श्रीलंकेसमोर १८५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेला मलेशियाचा संघ १९.५ षटके खेळून अवघ्या ४० धावांवर गारद झाला. केवळ एका फलंदाजाला १० धावा करता आल्या, याशिवाय एकही फलंदाज दुहेरी आकडा गाठू शकली नाही. एल्सा हंटरने ११ चेंडूत १० धावा केल्या तर ४ फलंदाज आपले खातेही उघडू शकल्या नाहीत.
श्रीलंकेकडून गोलंदाजीत शशिनी गिम्हानीने ४ षटकांत ९ धावा देत ३ बळी घेतले. तर काव्या कविंदी आणि कविशा दिलहरी यांनी प्रत्येकी २ यश संपादन केले.





# श्री तारा माँ मिशनद्वारा गुरुपूर्णिमेचा भव्य मंगल सोहळा संपन्न



ठाणे : श्री तारा माँ मिशनद्वारा सद्गुरु पूर्णिमेचा भव्य मंगल सोहळा श्री माँ वनस्थली आश्रम व श्री माँ हॉल, पातलीपाडा येथे साजरा करण्यात आला. वनस्थली आश्रमात सकाळी ५ वाजता ॐकार, भजन, आरतीने गुरुपूर्णिमेच्या मंगल कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. श्री शिर्डी साईबाबा मंदिरात व ब्रह्मलीन परमपूज्य श्री स्वामी ॐकारानंद समाधी मंदिरात अभिषेक व आरती झाल्यानंतर श्री सिद्धीविनायक मंदिर परिसरात हवनाचा कार्यक्रम सिद्ध झाला. श्री माँ भव्य सभागृहात भजन व मधुर भक्ति गीताचा कार्यक्रम सादर करण्यात आला. नंतर दिव्यस्वरुपी सद्गुरु श्री तारा माँ यांचे गुरुमहात्म्यावर सुश्राव्य प्रवचन झाले. दर्शन महाप्रसादानंतर कार्यक्रम संपन्न झाला.

# डोंबिवलीतील बेकायदा राधाईच्या जमीन मालकांच्या जीवाला गुंडापासून धोका

**ठाणे पोलीस आयुक्तांकडे संरक्षणाची मागणी**

डोंबिवली : नांदिवली पंचानंद येथे भूमाफियांनी उभारलेली बेकायदा राधाई इमारत तोडण्याचे आदेश जमीन मालकाने उच्च न्यायालयातून आणले आहेत. ही इमारत तोडण्यास भाजप कार्यकर्त्यांसह भूमाफियांनी जोरदार विरोध केला. न्यायालयाच्या आदेशाने ही बेकायदा इमारत तुटणार असल्याने विरोध करणाऱ्यांमधील काही गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांपासून आमच्या कुटुंबीयांच्या जिवाला धोका आहे. यासाठी आपण आम्हाला संरक्षणाच्या दृष्टीन कार्यवाही करावी, अशी मागणी राधाई इमारतीच्या जमिनीचे मालक जयेश हिरामण म्हात्रे यांनी ठाणे पोलीस आयुक्तांकडे केली आहे.

## गुन्हे दाखल करा

राधाई इमारत तोडण्यास विरोध करणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांवर पोलिसांनी चौकशी करून गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी माहिती कार्यकर्ते कौस्तुभ गोखले यांनी पोलिसांकडे केली आहे. डोंबिवलीतील ब्राह्मण सभेसमोरील आपल्या मालकी हक्काच्या जमिनीवरील भावना बेकायदा इमारत तोडण्यास १५ वर्षापूर्वी पालिकेचे पथक आले होते. त्यावेळीही भाजपचे पदाधिकारी ही कारवाई रोखण्यासाठी पुढे आले होते, अशी पुष्टी गोखले यांनी जोडली, बेकायदा बांधकामांची पाठराखण करणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल झाले पाहिजेत, असे गोखले यांनी तक्रारीत म्हटले आहे.

या निवेदनाच्या प्रती गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपायुक्त सचीन गुंजाळ, साहाय्यक पोलीस आयुक्त सुनील कुराडे, मानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांना देण्यात आल्या. आपल्या मालकीच्या हक्काच्या नांदिवली पंचानंद येथील जमिनीचा भूमाफियांनी बेकायदा ताबा घेतला. त्यावर बेकायदा राधाई इमारत आम्हाला धाकदपटश्या दाखवून उभारण्यात आली. त्यावेळीही आम्हाला विविध माध्यमातून धमक्या, दटावण्यात केल्या जात होत्या, असे तक्रारदार जयेश म्हात्रे यांनी तक्रारीत म्हटले आहे.

राधाई इमारतही जमीनदोस्त होणार असल्याने या इमारतीवरील आपला हक्का कायम ठेवण्यासाठी प्रयत्नशील असलेले, तसेच या इमारतीच्या तोडकामाला विरोध करणाऱ्या भाजप कार्यकर्त्यांसह इतर गुन्हेगार प्रवृत्तीचे



लोकही या विरोध आंदोलनात सहभागी झाले होते. अशा मंडळींपासून आपल्यासह आपल्या कुटुंबीयांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे, असे जयेश यांनी तक्रारीत म्हटले आहे.

राधाई इमारत तोडू नये म्हणून विरोधासाठी जमललेल्यांमध्ये काही गुन्हेगार प्रवृत्तीचे, काही तुरूंगात जाऊन आलेले लोक होते. राधाई इमारत तोडण्यासाठी आलेल्या पालिका आणि पोलिसांसमोर या मंडळींनी जो धिंगाणा घातला. त्यावरून ते आपली पातळी सोडून इमारत वाचविण्यासाठी काहीही करू शकतात, असे तक्रारीत म्हटले आहे.

गेल्या चार वर्षापूर्वी जयेश म्हात्रे यांच्या नांदिवली पंचानंद येथील वडिलोपार्जित जमिनीचा दहशतीच्या जोरावर ताबा घेऊन मे. स्वस्तिक होम्सचे मयूर रवींद्र भगत यांच्यासह सचीन विष्णू पाटील, संजय विष्णू पाटील, राधाबाई विष्णू पाटील, सुरेश मारूती पाटील यांनी संगनमत राधाई बेकायदा इमारतीची उभारणी केली आहे, असे जयेश यांनी तक्रारीत म्हटले आहे.

राधाई तोडण्यास विरोध करणाऱ्या भाजप पदाधिकाऱ्यांची छायाचित्रे, दृश्यध्वनी चित्रफित, समाज माध्यमांवर भाजप पदाधिकाऱ्यांनी प्रसिध्द केलेले इमारत तोडण्या विरोधातील छायाचित्रे जयेश यांनी जमा करून उच्च न्यायालयात दाखल करण्याची तयारी केली आहे.

## ठाणेकर कोंडीच्या विळख्यात

ठाणे : गेल्या काही दिवसांपासून खड्डे, वाहने बंद पडत असल्याने दररोज वाहतुक कोंडीला ठाणेकरांना समोरे जावे लागत आहे. मंगळवारी देखील हीच परिस्थिती आहे. मंगळवारी सकाळी कापूरबावडी उड्डाणपूलावर वाहन बंद पडल्याने कापूरबावडी ते मानपाडा पर्यंत वाहतुक कोंडी झाली आहे. तर सोमवारी रात्रीपासून खारेगाव टोलनाका भागात खड्डे भरण्याच्या कामांमुळे येथील अवजड वाहनांच्या रांगा मुंब्रा बाह्यवळण मार्गावरील मुंब्रा देवी मंदिरापर्यंत लागल्या आहेत. शहरातील इतर रस्त्यांवर देखील हीच परिस्थिती आहे. त्यामुळे ठाणेकर कोंडीच्या विळख्यात अडकल्याचे चित्र आहे. घोडबंदर येथून कापूरबावडीच्या दिशेने क्रेन जात होते. हे क्रेन कापूरबावडी उड्डाणपूलावर आले असता, अचानक बंद पडले. त्यामुळे सकाळी कापूरबावडी ते मानपाडा पर्यंत वाहनांच्या लांब रांगा लागल्या आहेत. काही वाहन चालकांनी ढोकाळी, आर-मॉल, मनोरमानगर येथील अंतर्गत रस्त्यांचा वापर करण्यास सुरूवात केली. त्यामुळे या मार्गांवरही वाहनांचा भार वाढून कोंडी झाली आहे. तर मुंबई नाशिक महामार्गावर नारपोली वाहतुक पोलिसांच्या हद्दीत खड्डे बुजविण्याचे काम सुरू सोमवारी रात्री सुरू होते. या कामांमुळे खारेगाव टोलनाका ते मुंब्रा बाह्यवळण मार्गावर वाहनांच्या लांब रांगा लागल्या आहेत. त्यामुळे डोंबिवली, नवी मुंबई, शिळफाटा येथून ठाणे, मुंबईच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या चालकांचे हाल झाले आहेत.

# बँक ऑफ महाराष्ट्रच्या अंबरनाथ आणि बदलापूर शाखेचे उद्घाटन

अंबरनाथ : बँक ऑफ महाराष्ट्रच्या दोन शाखेंचा उद्घाटन सोहळा मंगळवारी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अंबरनाथ विधानसभेचे आमदार डॉ. बालाजी किणीकर, बदलापूरचे मुख्याधिकारी योगेश गोडसे यांनी उपस्थिती लावली होती. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून करण्यात आली. अंबरनाथच्या पूर्वेकडील आनंदनगर, एमआयडीसी येथील शाखेचे उद्घाटन आ. डॉ. बालाजी किणीकर यांच्याहस्ते करण्यात आले. तर बदलापूर पश्चिमेकडील बेलवली येथील शाखेचे उद्घाटन कुळगांव बदलापूरचे मुख्याधिकारी योगेश गोडसे यांच्याहस्ते करण्यात आले. अंबरनाथमधील शाखेचे उद्घाटन झाल्यानंतर आ. किणीकर यांचे स्वागत शाखेचे मॅनेजर वामसी कृष्णा अर्धानी यांनी केले. तर बदलापूरमधील शाखेचे उद्घाटन झाल्यानंतर मुख्याधिकारी गोडसे यांचे स्वागत शाखेचे मॅनेजर अंकुर कुमार यांनी केले.





ग्राहकांना होम लोन, कार लोन आदी सुविधासह बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेच्या माध्यमातून ग्राहकांना कशा पद्धतीने चांगली सेवा देता येईल, याकडे प्राधान्याने लक्ष केंद्रित करणार असल्याचे ठाणे जिल्ह्याचे झोनल मॅनेजर राजकिशोर रंजित यांनी सांगितले. याप्रसंगी आ. डॉ. बालाजी किणीकर, मुख्याधिकारी योगेश गोडसे, आमाचे अध्यक्ष उमेश तायडे, ठाणे झोनल मॅनेजर राजकिशोर रंजित, उद्योजक रूपा देसाई-जगताप, अंबरनाथ शाखेचे मॅनेजर वामसी कृष्णा अर्धानी, बदलापूर शाखेचे मॅनेजर अंकुर कुमार यांच्यासह अनेक मान्यवर, पदाधिकारी व ग्राहक मोठया संख्येने उपस्थित होते.



लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंती दिनानिमित्त महापालिका मुख्यालयात आज त्यांच्या प्रतिमेस महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या समयी उपस्थित अतिरिक्त आयुक्त धैर्यशील जाधव, शहर अभियंता अनिता परदेशी, उपायुक्त अतुल पाटील, अवधूत तावडे, विभाग प्रमुख ( माहिती व जनसंपर्क) संजय जाधव,कार्यकारी अभियंता अशोक घोडे, मनोज सांगळे, शैलेश मळेकर , माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे , सहा.अभियंता दत्ताराव मोरे तसेच इतर कर्मचारी वर्ग यांनी देखील लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करून अभिवादन केले. कल्याण (प) येथील टिळक चौकातील, लोकमान्य टिळक यांच्या पुतळयास देखील शहर अभियंता अनिता परदेशी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. डोंबिवली (पू) येथील फ प्रभागाच्या कार्यालयात देखील लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस उपायुक्त रमेश मिसाळ, यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. या समयी सहा.आयुक्त भारत पवार इतर कर्मचारी वर्गाने देखील लोकमान्य टिळक यांच्या पुतळयास पुष्पसुमने अर्पण करून अभिवादन केले.



ठाणे महापालिकेच्या विद्यमाने महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती निमित्त अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे व उपायुक्त उमेश बिरारी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी उपायुक्त जी.जी गोदेपुरे, सचिन पवार, प्र. उपमाहिती जनसंपर्क प्राची डिंगणकर यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.




भारतीय असंतोषाचे जनक , स्वांतत्र्य लढ्यातील अग्रणी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंती निमित्ताने पनवेल पालिकेच्या मुख्यालयात आज (२३ जुलै ) त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त बाबासाहेब राजळे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, महापालिका अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# अर्थसंकल्पाचा परिणाम मजबूत आणि लवचिक रिअल इस्टेटमध्ये होईल असा आशावाद : जितेंद्र मेहता

ठाणे : अर्थमंत्र्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात पायाभूत सुविधांवरील वाढीव खर्च, रोजगार निर्मितीवर भर देणे आणि एमएसएमई क्षेत्राला नवसंजीवनी देण्यावर भर दिला. तिने आयकराशी संबंधित सकारात्मक उपायांचाही उल्लेख केला, या उपक्रमांमुळे आर्थिक वाढ होईल आणि रिअल इस्टेटची मागणी वाढेल, असे CREDAI MCHI ठाणेचे अध्यक्ष जितेंद्र मेहता यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, विकसित भारत' डोळ्यासमोर ठेवून, माननीय अर्थमंत्र्यांनी शहरी विकास आणि पायाभूत सुविधा या सरकारच्या मुख्य फोकस क्षेत्रांपैकी एक असल्याचे सांगितले.

ते म्हणाले, ठाण्यातील रिअल इस्टेट प्रस्तावांची वाट पाहत आहे ज्यामुळे अधिकाधिक घर शोधणारे त्यांचे स्वप्नातील घर खरेदी करू शकतील आणि ते प्रत्यक्षात आणू शकतील.

उद्योगाच्या दृष्टीकोनातून, जमिनीशी संबंधित अनेक सुधारणांवर राज्यांसोबत काम करण्याबाबत माननीय अर्थमंत्र्यांनी केलेली घोषणा, ज्यामध्ये जमीन प्रशासन, नियोजन आणि शहरी नियोजन आणि बांधकाम उपविधी समाविष्ट आहेत. जितेंद्र मेहता म्हणाले, सर्व जमिनींसाठी एक अद्वितीय आधार असाइनमेंट, भू-नकाशांचे



डिजिटायझेशन, जमिनींचे सर्वेक्षण आणि जमीन नोंदणीची स्थापना, शहरी भागातील जमिनीच्या नोंदी डिजिटल केल्या जातील याचा रिअल इस्टेटवर सकारात्मक परिणाम होईल.

तिच्या अर्थसंकल्पीय भाषणात, माननीय अर्थमंत्र्यांनी PMAYAU ला चालना देण्यासाठी उपाययोजनांचा उल्लेख केला; रेंटल हाऊसिंग, स्मार्ट सिटीज आणि ट्रान्झिट ओरिएंटेड विकास; या सकारात्मक उपाययोजनांकडे लक्ष वेधतात जे रिअल इस्टेट विकासासाठी वाढीचा मार्ग आणतील, ते पुढे म्हणाले.

समतोल प्रादेशिक विकासाला चालना देण्याचे रिअल इस्टेट क्षेत्राचे उद्दिष्ट शहरी स्थलांतराच्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी शहरी पायाभूत सुविधा वाढवण्यावर केंद्रित आहे. उद्योगाची अपेक्षा अशी आहे की अंदाजित आर्थिक वाढ आणि ग्राहकांच्या आत्मविश्वासातील सुधारणा मोठ्या संख्येने गृहखरेदीदारांना त्यांच्या स्वप्नातील घरे खरेदी करण्यासाठी प्रोत्साहित करून गृहनिर्माण बाजारावर सकारात्मक परिणाम करेल. मी आशावादी आहे की अर्थसंकल्पाचा परिणाम मजबूत आणि लवचिक रिअल इस्टेटमध्ये होईल, त्यांनी निष्कर्ष काढला.

# भाईंदरमध्ये आयोजित मोफत नेत्रचिकित्सा शिबीर



भाईंदर : निरंकारी सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराज यांची 'नर सेवा, नारायण पूजा'ची शिकवण अंगीकारुन संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनच्यावतीने रविवारी, २१ जुलै रोजी संत निरंकारी सत्संग भवन, शिवशक्ती नगर, भाईंदर येथे मोफत नेत्रचिकित्सा व मोतीबिंदु ऑपरेशन शिबिराचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये २९० गरीब व गरजू नागरीक लाभान्वित झाले. या शिबिरामध्ये ३० व्यक्तींना मोतीबिंदु असल्याचे आढळून आल्याने त्यांचे मोफत ऑपरेशन होण्यासाठी त्यांना के. बी. हाजी बच्चुअली चॅरिटेबल हॉस्पिटल, मुंबई यांच्याकडे संदर्भित करण्यात आले. तर ९५ व्यक्तींना चष्मे वाटण्यात आले. उर्वरित नेत्ररुग्णांना मोफत औषधोपचार देत डोळ्यांची निगा राखण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांकडून आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरामध्ये नॅशनल एसोसिएशन फॉर ब्लाईंड आणि पोदार हॉस्पिटल, मुंबई येथील नेत्र तज्ञांनी नेत्र तपासणीच्या सेवेमध्ये आपले महत्वपूर्ण योगदान दिले. अशाच प्रकारचे मोफत नेत्र चिकित्सा शिबिर संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने दरमहा पहिल्या रविवारी म्युनिसिपल स्कूल, वरळी, मुंबई येथे आयोजित करण्यात येते.

# शिवसंस्कृती ट्रस्टमार्फत विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटप





ठाणे : गुरुपौर्णिमेनिमित्त शिवसंस्कृती ट्रस्टमार्फत जिल्हा परिषद शाळा शीळ, कातकरीवाडी, शहापूर आणि जिल्हा परिषद शाळा बर्डेपाडा, केंद्र किन्हवली, ता.शहापुर, जिल्हा ठाणे या दोन शाळांमधील विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या वह्या, कंपास, अंकलिपी, चित्रकला वह्या, रंगीत खडू, पेन, पेन्सिल, पट्टी, खोडरबर, शार्पनर इत्यादी शैक्षणिक साहित्यांची मदत पुरविण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा परिषद शाळा बर्डेपाडाच्या शिक्षिका जयश्री शिर्के व जिल्हा परिषद शाळा, शीळचे मुख्याध्यापक महेश चौधरी यांच्या हस्ते छत्रपती श्री शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले आणि शाळेतील तसेच शिक्षकांना शिवरायांची तेजोमय प्रतिमा अर्पण करण्यात आली. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले पुष्पगुच्छ देऊन ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले.

यावेळी शिवसंस्कृती ट्रस्टचे सदस्य श्री. संतोष भाबड यांच्यावतीने या दोन्ही शाळेच्या विद्यार्थ्यांना समोसा, वेफर्स, गोड बुंदी ई. अल्पोपहार देण्यात आला. त्यानंतर मान्यवर आणि ग्रामस्थांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व वह्या-पुस्तके यांचे वाटप करण्यात आले.

ही शैक्षणिक मदत उपलब्ध करण्यासाठी ट्रस्टला सहकार्य केलेले सर्व देणगीदार व हितचिंतक यांचे शाळा प्रशासनाकडून आभार मानण्यात आले. या उपक्रमासाठी ट्रस्टचे सदस्य संतोष भाबड यांनी वाहतुकीसाठी रिक्षा उपलब्ध करून दिली. तसेच हा उपक्रम पार पाडण्यासाठी शहापुर येथील सामाजिक कार्यकर्ते नंदू आवार यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या उपक्रमावेळी ट्रस्टचे विश्वस्त अमर रणवरे, विनय गावडे तसेच सदस्य श्री. संतोष भाबड, नंदू आवार इत्यादी उपस्थित होते.

या शैक्षणिक वर्षात ट्रस्टच्या देणगीदारांच्या सहकार्याने जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना वह्या व इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याचा ट्रस्ट मार्फत प्रयत्न केला जाईल, असे विश्वस्तांनी सांगितले.

# गुरु पौर्णिमेनिमित्त लक्ष्मी स्कूल येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्यचे वाटप



ठाणे :शिवतेज प्रतिष्ठान विटावा, ठाणे यांच्या माध्यमातून गुरु पौर्णिमेनिमित्त लक्ष्मी स्कूल, विटावा येथील पहिली ते चौथीच्या १६० विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, कंपास बॉक्स आदी शालेय साहित्यचे वाटप तसेच खाऊ वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे शाळेला भेट म्हणून पाच पंखे आणि पाच ट्यूबलाइट देण्यात आले.

यावेळी शिवतेज प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश बनकर, उपाध्यक्ष अरुण एकावडे, खजिनदार विनोद मुळीक, उपसचिव संतोष देसाई तसेच प्रतिष्ठानचे सभासद गणेश साळुंके, संदीप तुपे, नीलकंठेश्वर मुळे, बाबासाहेब दबडे, समीर खैरकर, रितिक खंडागळे, अविनाश सोनवणे, ओमकार शिर्के तसेच लक्ष्मी स्कूलचे संस्थापक डॉ. अशोक दांडेकर, संचालक उल्हास दांडेकर तसेच प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका नीता भंडारे, माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका रचना जगताप आणि सर्व शिक्षक वृंद आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी बालवयात असतांना शिक्षणासोबत सामाजिक बांधिलकी प्रस्थापित करण्याच्या दृष्टिकोनातून पाऊले उचलावी ती काळाची गरज आहे आणि छत्रपती शिवाजी महाराज छत्रपती संभाजी महाराज तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजसेवा विचारांचे मार्गदर्शन विद्यार्थांना यावेळी शिवतेज प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश बनकर यांनी केले.

त्याप्रमाणे लक्ष्मी स्कुलचे संस्थापक डॉ. अशोक दांडेकर यांनी चांगली संगत आणि मैत्री आजच्या युगात माणसाला चांगले कसे बनवते ती उपस्थिती विद्यार्थ्यांना पटवून दिले.

अशाप्रकारे शिवतेज प्रतिष्ठान सलग आठ वर्षांपासून सामाजिक कार्य करत आहे.

यावेळी वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, अनाथश्रम, बालश्रम आणि वृद्धाश्रम येथे जाऊन आरोग्य शिबीर आणि धान्य वाटप करत असतात आणि बालश्रमातील निराधार मुलांचे मोफत केस कर्तन करत असतात. त्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराने प्रेरणेतून शिवजयंती उत्सवानिमित्त भव्य आरोग्य शिबीर, नेत्र तपासणी शिबीर आणि सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडतात. त्याचप्रमाणे प्रत्येक वर्षी सभासद वेगवेगळ्या गड-किल्ल्यांवरती जाऊन गडसंवर्धन आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची माहिती घेण्याचे काम करतात. त्यानंतर प्रतिष्ठानतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक वाटचाली करता शुभेच्छा देण्यात आल्या.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१